# बेंडाळे महिला महाविद्यालयात महिलांविषयक कायद्याची जाणीव जागृती कार्यशाळा संपन्न

डॉ. अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालय जळगांव येथे विद्यार्थीनीमध्ये कायद्याची जागरुकता निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोगामार्फत आयोजित स्पर्धा परिक्षेसाठी महिलांविषयक कायद्यांची जाणीव जागृती कार्यशाळा संपन्न झाली. त्याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून २२ वर्ष मंत्रालयात विधि सचिव म्हणून कार्यरत असलेल्या ॲड. डॉ. मंगला ठोंबरे लाभल्या होत्या.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एस. राणे होते. कार्यक्रमाचे उद्‌घाटन उपप्राचार्या प्रा.रत्ना महाजन, ॲड डॉ. मंगला ठोंबरे यांच्या हस्ते झाले. प्रथम सत्रात ॲड. मंगला ठोंबरे यांनी महिलांविषयक कायदे तसेच भारतीय संविधानाविषयी माहिती सांगितली. विविध कलमांच्या माध्यमातून महिलांसाठी असलेले स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, लैंगिक शोषण, अत्याचार बलात्कार विरोधी कायदे, अपराध्याला मिळणारी शिक्षा याबाबत विस्तृत माहिती दिली. महिलांचे शिक्षण, मूलभूत गरजा, अवयव तस्करीचे प्रमाण, अपव्यापार, वेठबिगारी, बालकामगार यांच्याविषयी सांगितले. अत्याचार झालेल्या पिडीत महिलेला कारकिर्दीच्या, मानसिक परिणामांच्या व झालेल्या नुकसानीचा विचार करुन भरपाई मिळते असे सांगितले.

व्दितिय सत्रात ॲड. डॉ. ठोंबरे यांनी कामाच्या ठिकाणी होणा-या लैंगिक छळांबाबत असलेले कायदे, महिलांना प्रसुतीविषयक मिळणारे लाभ, प्रसुतीपूर्व गर्भपात झाल्यास मिळणा-या रजा, लिंगनिवडीस प्रतिबंध, हुंडा प्रतिबंध, वनवासी हक्क कायदा, अनुसुचित जाती व अनुसुचित जनजाती अत्याचार प्रतिबंध कायदा इ. विषयांवर विस्तृत मार्गदर्शन केले. त्यानंतर राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना व आयोगाचे कार्य याबाबत सांगितले. कार्यशाळेसाठी समन्वयक म्हणून प्रा. संध्या फेगडे यांनी काम पाहिले. कु. अश्विनी कांबळे व कु. गायत्री पाटील यांनी मनोगत व्यक्त केले व ॲड. डॉ. मंगला ठोंबरे यांचे आभार मानले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. मनिषा पाटील यांनी केले.

